# संत साहित्यातील लोकशिक्षक संत तुकाराम

**प्रा. रेखा दिगांबर अढाव,**

**श्री.धाबेकर कला महाविद्यालय,खडकी (चां.), अकोला.**

---

भारतीय संस्कृतीच्या सांस्कृतिक इतिहासाचा अभ्यास करतांना अनेकविध संस्कृती–परंपरांचा धांडोळा घ्यावा लागतो. भारताच्या सांस्कृतिक परंपरेत वैदिक धर्माचा आणि संस्कृत भाषेचा प्रभाव अधिक गहिरा होता. समाजामध्ये वर्णाश्रमव्यवस्था रुढ होती. धर्म, अर्थ, काम, मोक्ष, हे चार पुरुषार्थ समाजात मुख्य समजले जात होते. वैदिक धर्माच्या संस्कार, आचारतत्त्वांना समाजात अनन्यसाधारण असेच महत्त्व होते. वैदिक धर्माची आचारतत्त्वे सामान्य माणाला अनुसरण्यास अवघड होती. परिणामी वैदिक धर्म आणि त्याची तत्त्वप्रणाली सामान्य माणसाच्या आचरणकक्षेत येऊ शकली नाही. सामान्य माणसाची जी बौद्धिक आणि आत्मिक विकासाची तहान होती. ती तहान वैदिक धर्म शमवू शकला नाही. समाजातील बहुसंख्य लोकांना आपल्या आत्मोन्नतीसाठी मार्ग दिसेना. समाजमन अशा प्रकारे सैरभैर असले तरी समाजात दुसरीकडे जैन धर्म, लिंगायत धर्म, दत्त संप्रदाय या नि यांसारख्या पंथ संप्रदायाच्या उदयाला प्रारंभ झाल्याचे दिसून येते. वैदिक परंपरेतील जाचक नियम–आचरणाच्या कचाट्यातून सुटलेला बहुजनवर्ग विविध पंथ–संप्रदायाच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करतांना दिसतो. वैदिक परंपरेतील अनेक जाचक सोपस्कारांना फाटा देऊन नवसंस्कारांची पेरणी करणारे पंथ, संप्रदाय, समाजमनाची मशागत करण्यासाठी सरसावले होते. प्रारंभी दत्त संप्रदाय, शैव, लिंगायत तसेच महानुभाव पंथ तत्त्वज्ञानाची मांडणी मानवतेखातर जन्मली असल्यामुळे बहुजनवर्गाला त्यातून प्रारंभी दिलासा मिळाला असला तरी. पुढे जेव्हा तत्त्वज्ञानाच्या खोलात जाऊन अभ्यास करण्याची वेळ आली तेव्हा मात्र काही मर्यादा लक्षात आल्या.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाची पाने अभ्यासता असे लक्षात येते की, इ.स. १० ते १७ व्या शतकाचा काळ हा संक्रमणाचा काळ होता. भारताच्या विशेषतः महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात यावेळी अतिशय वेगवेगळ्या प्रकारची सांमाजिक संक्रमणे झाल्याचे दिसून येते. बहुजनवर्गाला रुचेल, पचेल नि अंगिकारता येईल अशी अध्यात्मपरंपरा निर्माण होणे ही काळाची गरज झाली होती. महाराष्ट्रामध्ये अकराव्या ते चौदाव्या शतकापर्यंत सांस्कृतिक बदलाचे वारे झपाट्याने वाहतांना दिसते. बाराव्या–तेराव्या शतकात वर्णाश्रमव्यवस्थेला पर्यायी व्यवस्था म्हणजे मानवतावादी विचारांची पेरणी करणारी समांतर व्यवस्था. समाजात रुजविण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने केल्याचे दिसून येते. वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान धार्मिक समतावादी तत्त्वावर रुढ अल्यामुळे बहुजनवर्गाला ते आपलेसे वाटले. वारकरी संप्रदायाचे अद्वैती आणि समतावादी तत्त्वाज्ञानच बहुजनवर्ग समजू शकला. खऱ्या अर्थाने तत्त्वज्ञान आणि धर्माचा खोलात जाऊन विचार करण्याची मानसिकता बहुजनवर्गाची नव्हती. समाजामधे आपल्याला मानवतावादी विचारसरणी, तत्त्व आचारणात दिसेल अशी व्यवस्था बहुजनांना अभिप्रेत होती.वारकरी संप्रदाय समाजातील

तळागाळातल्या माणसापर्यंत जलद गतीने पोहोचण्याचे कारण त्या संप्रदायाची मानवतावादी मूल्यांची रचनात्मक असलेली बांधणी होय. वारकरी संप्रदायाने मूल्यांची मांडणी फक्त तत्त्ववादीपणे केली असे नसून वारकऱ्यांच्या जगण्यातून मूल्यांची प्रचिती समाजाला येऊ लागली. सर्वसामान्य माणसाला समजेल, पचेल, रुचेल अशा भाषेत केलेले तत्त्वज्ञान निरुपण, लोकसमुहाची जी बोली भाषा 'मराठी' त्या मायमराठीतून बहुजनवर्गाला उपदेश करण्याचे प्रयोजन वारकरी संतांनी समोर ठेवल्याचे दिसून येते. वैदिक धर्मपरंपरा आणि संस्कारांच्या नावाखाली कर्मकांडामध्ये गुदमरुन चाललेल्या समाजानी वारकरी संप्रदायाच्या निखळ मानवीय मोकळ्या वातावरणात जगू लागले.वारकरी संप्रदायाच्या पायाभरणीचे काम संत नामदेवांने, संत ज्ञानेश्वरांनी प्रारंभी केल्याचे दिसून येते. संत नामदेवांनी तर वारकरी संप्रदायाचे लोण महाराष्ट्राबाहेर उत्तरप्रदेश, पंजाब, गुजरात यांसारख्या हिंदी भाषिक राज्यापर्यंत पोहचविले. वारकरी संप्रदायातील अभ्यासू नि क्रांतीकारी संत म्हणून संत तुकारामांचा उल्लेख अतिशय आदराने करावा लागतो. समाजातील जाती व्यवस्था, चातुर्वर्व्यव्यवस्थेला सुरुंग लावून कर्माधारीत जगण्याची व्यवस्था सन्मानाने समाजात रुजावी करिता वारकरी संतांनी अनेकविध प्रयत्न केल्याचे दिसून येते. संत शिरोमणी तुकारामांनी चातुर्वर्व्यव्यवस्था नाकारुन कर्मश्रेष्ठत्वाला प्राधान्य देऊन त्याचा पुरस्कार केला. समाजामधील धर्मसुधारणा आणि कर्मश्रेष्ठता या कार्यासाठी संत तुकारामांनी स्वतःला वाहून घेतले.संत तुकारामांचा जीवनपरिचय करुन घेतांना अनेकप्रकारची अभ्यासपूर्ण माहिती आपणास गवसते. तुकारामांचे पूर्ण नावं तुकाराम बोल्होबा आंबिले. त्यांचे जन्मगाव देहू हे पुण्याजवळ असलेले छोटेसे गाव आहे. देहू गावात तुकारामांचे पूर्वज वैश्यव्यापार करीत असत. तुकारामांच्या कुटुंबात पूर्वापार ईश्वरभक्ती चालत आलेली दिसून येते. ईश्वरभक्तीचा वारसा कुटुंबातूनच मिळाल्यामुळे तुकारामांवर सात्विकतेचे संस्कार झाले होते. तुकारामांचा पिंड चिंतकाचा नि अभ्यासकाचा असल्याचे त्यांच्या अभंगावरुन लक्षात येते. समाजातील प्रश्न आणि समस्यांचा तुकारामांनी अतिशय जवळून अभ्यास केला होता. तुकारामांनी आपल्या ऐन उमेदीच्या काळात समाजातल्या अनेक उलथापालथीच्या परिस्थितीचा अभ्यास केला होता. इ.स. १६२९–३० या दरम्यान खूप मोठा दुष्काळ समाजात पडला होता.

त्या दुष्काळाची धग समाजातील प्रत्येक स्तरातल्या माणसाला जाणवली होती. दुष्काळाने समाजात झालेली अन्नान्न दशा तुकारामांनी अतिशय जवळून अभ्यासली होती. या दुष्काळाच्या स्थितीत तुकारामांनी आपल्या आप्तस्वकियांना गमावले होते. त्याची, वेदना त्यांच्या मनात होती. समाजात दुष्काळाच्या रुपाने शिरलेला राक्षस अशी राखरांगोळी करुन टाकेल याची त्यांना पुसटशी कल्पना नव्हती. वैयक्तिक संसाराची नि सामाजिक संसाराची झालेली वाताहत बघून तुकारामांचे मन विषन्न झाले होते.तुकारामांच्या घरात असलेली ईश्वरभक्ती आणि कर्मशुद्धता यांच्या मूशीतून घडलेल्या तुकारामांच्या संस्कारित मनामधे यानिमित्ताने अनेक प्रश्न निर्माण झाले होते. तुकारामाकडे विवेकबुध्दीचा असलेला मूळचाच झरा चिंतन–मनातून खळखळायला लागला नि मानवी जीवनातील क्षणभंगुरता त्यांच्या लक्षात आली. शरीराचे नश्वरत्व आणि आल्याचे अमरत्व त्यांच्या निदर्शनास आले. जगण्यातली भिषनता अनुभवलेल्या तुकारामांनी आत्मचिंतनास प्रारंभ केला. आपल्या जगण्याचे प्रयोजन काय? या प्रश्नाच्या उत्तरासाठी त्यांनी आपली प्रज्ञा खर्ची घातली. तुकारामांनी आध्यात्मिक प्राप्तीसाठी बाबाजी चैतन्यांकडून दीक्षा घेऊन आपल्या आध्यात्मिक प्रवासाला केला.संत तुकारामांच्या ठिकाणी असलेली अध्यात्मवृत्ती आत्ममग्न नव्हती.

तुकारामांचे व्यक्तिमत्वच मूळी समाजाभिमुख होते. संत तुकारामांनी आपल्या चिंतन–मननातून जे अध्यात्माचे नवनीत हाती आले त्याचा खाऊ करुन समाजापर्यंत पोहोचविला. वास्तविक तुकारामांचे वैयक्तिक जीवन ठाकठिक होते. त्यामधे फारशी उच–खोल प्रश्नांची जंत्री नव्हती. काही वैयक्तिक नि अनेक सामाजिक प्रश्नातूनच त्यांना आत्मोनतीची प्रेरणा मिळाली होती. एके ठिकाणी तुकाराम म्हणतात....

बुडती हे जन न देखवे डोळा म्हणूनी कळवळा येत असे।।

समाजप्रबोधनाची, जनकल्याणाची तळमळ त्यांना होती. तुकारामांच्या जगण्यातील तत्त्वज्ञानाचे सार सामान्य माणसाच्या आकलनक्षमतेत येणारे होते. अतिशय साध्या शब्दात तुकारामांनी आपल्या चिंतनातील संचित मांडले आहे.

जोडोनिया धन उत्तम वेव्हारे। उदास विचारे वेच करी।।

उत्तम चि गती तो एक पावेल। उत्तम भोगील जीव खाणी।।

परउपककारी नेणे परनिंदा। परस्त्रिया सदा बहिणी माया।।

भूतदया गाई पशूंचे पालन। तान्हेल्या जीवन वनामाजी।।

शांतिरुपे नव्हे कोणाचा वाईट। वाढवी महत्त्व वडिलांचे।।

तुका म्हणे हे चि आश्रमाचे फळ। परमपद बळ वैराग्याचे।।

जगण्यामध्ये वैराग्य नको किंवा संसारातील जबाबदारीपासून पळून जाने नको. अतिशय जबाबदारीचे प्रत्येक संसारी माणसाचे वर्तन असले पाहिजे. माणसचे माणसाशी मानवतेचे नाते असले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती. तुकारामांना अपेक्षित असलेले वैराग्य कर्मकांडावर आधारीत नव्हते. त्यांच्या मते वैराग्य ही मनाची अवस्था आहे. ती संसारात राहून निश्चल बुद्धीने, मनाने अनुभवता येणारी मनस्थिती आहे. आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. ही अवघी सृष्टीच ईश्वरमय आहे. याचा अर्थ ईश्वर म्हणजे सत्य, ईश्वर म्हणजे संपूर्ण अस्तित्व आणि ईश्वर म्हणजे प्रत्येकातली सज्जनशक्ती होय. माणसामधल्या सत्यातून, ईश्वरातूनच या पृथ्वीवरचे मानवी जीवन टिकून आहे. ईश्वर हा कणाकणात सामावलेला आहे. म्हणूनच तुकाराम म्हणतात.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेदभ्रम अमंगळ।।

आइका जी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हित सत्य करा।

कोणा ही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वरपूजनाचे।

तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुख–दुःख जीव भोग पावे।।

तुकारामांनी साध्या सोप्या शब्दांमध्ये आपल्या जगण्याचे तत्त्वज्ञान मांडले आहे. या

भूतलावरील अवघी मानवजात मानवतेच्या पातळीवर सर्वसमान आहे. त्यामुळे उच्चनिचतेच्या भावाला आपल्या जगण्यामधे स्थान असू नये. आपण सर्वांनी गुण्या गोविंदाने सहपरीवारासारखे नांदावे असा त्यांचा उपदेश होता.संत तुकारामांनी आपल्या समाजकार्याची दिशा निश्चित केली होती. समाजातील अनाचार, रुढी, प्रथा, परंपरांचा त्यांनी कडाडून विरोध केला होता. समाजमनामधे असलेला तत्कालीन कर्मकांडाधारित धर्मकल्पनेचा प्रभाव अधिक गडद होण्याच्या स्थीतीत होता. तुकारामांनी आपल्या दूरदृष्टीने समाजमनातील धर्मभयाची भावना ओळखून लोकांना भयमुक्त करुन नवा पर्याय देण्याचा प्रयत्न केला. माणसाचा धर्म हा समतेच्या तत्त्वावर आधारलेला असावा, बहुजनांना आत्मोन्नतीची वाट दाखविणारा असावा. याविषयीची तुकारामांची भूमिका स्पष्ट होती. तुकारामांच्या या रोकठोक भूमिकेचे प्रतिपादन खालील अभंगातून होते.

धर्माचे पालन। करणे पाखांड खंडण।

हे चि आम्हा करणे काम। बीज वाढवावे नाम।।

तीक्ष्ण उत्तरे। हाती घेऊनि बाण फिरे।।

नाही भीड भाड। तुका म्हणे सान थोर।।

तत्कालीन समाजात धर्माला आलेली अवकळा तुकारामांनी जवळून बघितली होती. निर्मळ शुद्ध स्वरुपात धर्मसंकल्पना रुजली पाहिजे नि समाजमनाला त्यातून दिलासा मिळाला पाहिजे. याविषयीचा तुकारामांचा विचार परखड होता. संतांनी समाजमनाला सदैव विधायक मार्गावर नेण्याचे प्रयत्न केलेले आपल्याला दिसून येतात. वारकरी संतांच्या विधायक कृती–कार्यक्रमाचे साक्षी असलेले तुकाराम त्याच भूमिकेत रंगलेले आपल्याला दिसून येतात. त्यांच्याच भाषेत सांगायचे झाल्यास…

आम्ही वैकुंठवासी। आलो या चि कारणासी।

बोलिले संतांचे मारग। साच भावे वर्तावया।।

सांडू संतांचे मारग। आडराने भरले जग।।

उच्छिष्टांचा भाग। शेष उरले ते सेवू।

अर्थे लोपली पुराणे। नाश केला शब्दज्ञाने।

विषयलोभी मन। साधने बुडविली

पिटू भक्तीचा डांगोरा। कळिकाळासी दरारा।

तुका म्हणे करा। जयजयकार आनंदे।

सर्व प्राणीमात्राविषयी आपल्या मनात असलेली समत्त्वदृष्टी तुकारामांच्या वचनातून

निदर्शनास येते. वैष्णवधर्माची सर्वधर्मसमधावाची तत्त्वे आचरणात आणणारे तुकाराम वृत्तीने भोळसट नसून विचक्षण आहेत. संतांच्या ठिकाणी असणाऱ्या सज्जनवृत्तीवर त्यांची अपार श्रद्धा होती. मोक्ष–मुक्ती यासारख्या मोठमोठ्या शब्दांमध्ये सामान्य माणूस गांगरुन गेला होता. गांजून गेला होता. अशा भ्रमित समाजाला योग्य मार्गदर्शन ज्या ज्या संतांनी केले त्यांच्या तत्त्वांना अनुसरण करण्याची गरज तुकारामांनी बोलून दाखविली. आपल्या संतपरंपरेनी अखिल मानवजातीला जो न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाचा उपदेश केला तीच परंपरा पुढे चालविण्याचा संकल्प तुकारामांनी केल्याचे दिसून येते.समाजामध्ये देवा–धर्माच्या नावावर चालू असलेली दांभिक वृत्तीची सोंग–ढोंग तुकारामांनी उघडी पाडली. आपले जीवनध्येय हे समाजजीवनातील आध्यात्मिक मरगळ दूर करुन समाजामधे समता नांदावी हे असल्याचे त्यांनी सांगितले.धर्मसुधारणेच्या आणि समाजसुधारणेच्या कामी तुकारामांनी आपले सर्वस्व वेचल्याचे आपल्याला दिसून येते. अद्वैतभक्तीचा पुरस्कार करणाऱ्या तुकारामांनी दंभ, ढोंग, नवससायास आदी कर्मकांडावर घणाघाती हल्ला केल्याचे दिसून येते.

दया तिचे नाव भूतांचे पालन। आणीक निर्दळण कंटकांचे।।

पाप त्याचे त्याचे नांव न विचारिता नीत। भलते चि उन्मत्त करी सदा

तुका म्हणे धर्म रक्षावयासाठी। देवास ही आटी जन्म घेणे।।

समाजामधे जे नैतिक अधःपतन होतेय ते थांबविणे काळाची गरज आहे. ‘सद्रक्षणाय! खलनिग्रहाय। हो पोलीस ब्रिद आपल्याला तुकारामांच्या भूमिकेत दिसून येते.

ऐसे कैसे जले भोंदू। कर्म करोवि म्हणती साधु।।

अंगा लावुनिया राख। डोळे झांकूनिया करिती पाप।।

दावुनि वैराग्याची कळा। भोगी विषयाचा सोहळा।।

तुका म्हणे सांगो किती। जळे तयाची संगती।।

समाजातील प्रथा–परंपरांचा नि धर्मसंकल्पनाचा तुकारामांनी आपल्या डोळस नि अभ्यासकदृष्टीने अभ्यास करुन त्यातील फोलपणा समाजासमोर मांडला. एवढ्यावरच तुकाराम थांबले नाहीत तर त्यांनी समाजाला जगण्यातली नि अध्यात्मातली वास्तविकता लक्षात आणून दिली.

ईश्वरसंकल्पनेविषयीचे तुकारामांचे विचार सर्वसामान्यांच्या सहज लक्षात येणारे होते. ते म्हणतात...

देही असोनिया देव। वृथा फिरतो निर्देव।।

देव आहे अंतर्यानी। व्यर्थ हिंडे तीर्थग्रामी।।

नाभी मृगाचे कस्तुरी। व्यर्थ हिंडे वनांतरी।।

साखरेचे मूळ उसे। तैसा देही देव दिसे।।

दुधी असता नवनीत। वेणे तयाचे मथित।।

तुका सांगे मूढजना। देही देव का पहाना।।

ईश्वराच्या खऱ्या रुपाची झालेली ओळख तुकारामांना मनोमन पटली नि जे जे आपणासी ठावे ते ते इतरांसी सांगावे। शहाणे करुनी सोडावे सर्वजण। या उक्तीप्रमाणे तुकारामांनी आपली ईश्वरप्रचिती समाजाच्या दृष्टीस आणून दिली. समाजाची कर्मकांडातून नि पाखंडातून मुक्तता करुन खऱ्या भक्तीचा नि सदाचाराचा, नैतिकतेचा उपदेश तुकारामांनी समाजाला केला.समाजमनातील भ्रामक समजुती आणि देव–धर्मविषयक संकल्पनांची जळमटे झटकून मानविय ईश्वरसंकल्पना समाजासमोर मांडण्याची ठाम भूमिका तुकारामांनी घेतल्याचे आपल्याला दिसून येते. संत तुकाराम आपल्याला खऱ्या अर्थाने 'वार' करी संत असल्याचे दिसून येते. समाजातील खळ–दुर्जनांची विकृत मानसिकता 'वार' करी तुकारामांनी समजुतीच्या आधारावर मुळासकट उपटून टाकण्याचे प्रयत्न केले. प्रसंगी माथा हाणू काठी अशी काहिशी विद्रोही भूमिका त्यांनी घेतल्याचे दिसून येते.वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची नि मानवी मूल्यांची बैठक तुकारामांच्या विचारात आपल्याला पूर्णपणे दिसून येते. तुकारामांनी आपले सर्वस्व समाजकल्याणासाठी वेचले होते. वारकरी संप्रदायाच्या समाजोद्धाराच्या उद्देशासाठी संत तुकारामांनी कुठल्याही विधिनिषेधाची पर्वा केली नाही.

'सत्यअसत्याशी मन केले, ग्वाहीमानियले नाही बहुमता।''

या उक्तीप्रमाणेच स्वविवेकानी सत्य जाणून सत्य जगण्याचा प्रयत्न तुकारामांनी केल्याचे दिसून येते. अन्याय, अनिष्टावर वार करुन स्वातंत्र्य, समता, बंधुता भाव जगणारा नि जागविणारा खरा वारकरी संत असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सुची :–**

१) कोलते वि.भि. : मराठी संतांचे सामाजिक कार्य, प्रकाशक : द.का. कोलते, यवतमाळ, आ. पहिली, १९६८

२) वाळिंबे, रा.शं. :साहित्यातील संप्रदाय, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, आ. तिसरी, १९७४.

३) सरदार, गं.बा. : संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, श्री विद्या प्रकाशन, पुणे, आ. चवथी, १९८२.

४) सानप, किशोर : युगपुरुष तुकाराम, लोकवाङ्मय गृह, मुंबई, आ. पहिली, १९९३.

५) डॉ. किशोर सापन : तुकाराम व्यक्तित्त्व आणि कवित्त्व, लोकवाङ्मय, गृह मुंबई.